मुल-चंद्रपूर राष्ट्रीय महामार्गाच्या तातडीच्या दुरुस्तीसाठी आ. सुधीर मुनगंटीवार यांचे केंद्रीय मंत्री नितीन गडकरींना पत्र

खड्ड्यांवर कायमस्वरूपी उपाय म्हणून महामार्गाच्या सिमेंट काँक्रीटीकरणाची आ. सुधीर मुनगंटीवार यांची मागणी

प्रवाशांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने कायमस्वरूपी उपाययोजनांवर आ. सुधीर मुनगंटीवार यांचा भर

चंद्रपूर : मुल-चंद्रपूर राष्ट्रीय महामार्गावरील वाढत्या खड्ड्यांमुळे प्रवाशांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असून, अपघातांचे प्रमाणही वाढत असल्याच्या पार्श्वभूमीवर राज्याचे माजी वने व सांस्कृतिक कार्य मंत्री आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री ना. नितीनजी गडकरी यांना सविस्तर पत्र पाठवून या महामार्गाची तातडीने उच्च दर्जाची दुरुस्ती करण्याची मागणी केली आहे. तसेच भविष्यात वारंवार होणारी हानी टाळण्यासाठी या महामार्गाचे टप्प्याटप्प्याने सिमेंट काँक्रीटीकरण करण्यासाठी प्रशासकीय मंजुरी देण्याची विनंतीही त्यांनी केली आहे. प्रवाशांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देत या महामार्गावर कायमस्वरूपी आणि दर्जेदार उपाययोजना राबविण्याची आवश्यकता आ. मुनगंटीवार यांनी पत्राद्वारे अधोरेखित केली आहे.

चंद्रपूर-मुल राष्ट्रीय महामार्ग (एनएच-९३०) हा विदर्भातील अत्यंत महत्त्वाचा राष्ट्रीय महामार्ग असून, या मार्गावरून दररोज हजारो मालवाहू ट्रक, बस, दुचाकी, चारचाकी वाहने तसेच शेतकरी, विद्यार्थी, कर्मचारी, व्यापारी आणि सर्वसामान्य नागरिक प्रवास करतात. याच मार्गावरून कृषी उत्पादनांची वाहतूक, औद्योगिक मालाची ने-आण तसेच पर्यटनालाही मोठी चालना मिळते.

मात्र सध्या या महामार्गाची अवस्था अत्यंत दयनीय झाली आहे. विशेषतः पावसाळ्यात मोठ्या प्रमाणात खड्डे पडल्याने वाहनचालकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत

आहे. या खड्ड्यांमुळे अपघात घडले असून, अनेक निष्पाप नागरिकांना आपला जीव गमवावा लागला आहे. अनेक जण गंभीर जखमी झाले असून, रुग्णवाहिकांनाही वेळेत पोहोचण्यात अडथळे निर्माण होत असल्याने आपत्कालीन रुग्णांच्या उपचारांवरही परिणाम होत आहे.

या गंभीर परिस्थितीची दखल घेत आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी केंद्रीय मंत्री नितीनजी गडकरी यांना पाठविलेल्या पत्रात या महामार्गाचे तातडीने तांत्रिक निरीक्षण करून संपूर्ण मार्गाची दुरुस्ती करण्याची मागणी केली आहे. तसेच भविष्यात वारंवार होणारे नुकसान टाळण्यासाठी या मार्गाचे टप्प्याटप्प्याने सिमेंट काँक्रीट (सीसी) रस्त्यात रूपांतर करण्यासाठी आवश्यक प्रशासकीय मंजुरी देण्याची विनंतीही त्यांनी केली आहे.

देशभरात पायाभूत सुविधांच्या विकासाला नवी दिशा देत उत्कृष्ट दर्जाचे राष्ट्रीय महामार्ग उभारण्याचे उल्लेखनीय कार्य केंद्रीय मंत्री ना. नितीनजी गडकरी यांच्या नेतृत्वाखाली सातत्याने होत आहे. त्याच धर्तीवर चंद्रपूर-मुल राष्ट्रीय महामार्गाचाही दर्जेदार विकास झाल्यास लाखो नागरिकांना सुरक्षित, वेगवान आणि सुकर प्रवासाची सुविधा उपलब्ध होईल. तसेच कृषी, उद्योग आणि पर्यटन क्षेत्रालाही नवी गती मिळेल, असा विश्वास आ. सुधीर मुनगंटीवार यांनी व्यक्त केला आहे.

प्रवाशांच्या सुरक्षिततेचा प्रश्न हा सर्वसामान्यांच्या दैनंदिन जीवनाशी आणि परिसराच्या विकासाशी निगडित असल्याची भूमिका सातत्याने मांडणारे आ. सुधीर मुनगंटीवार यांनी या महत्त्वाच्या प्रश्नाकडे पुन्हा एकदा केंद्र सरकारचे लक्ष वेधले आहे. या मागणीला सकारात्मक प्रतिसाद मिळून मुल-चंद्रपूर राष्ट्रीय महामार्गाची दर्जेदार दुरुस्ती आणि टप्प्याटप्प्याने सिमेंट काँक्रीटीकरणाची प्रक्रिया लवकर सुरू होईल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. त्यामुळे लाखो नागरिकांना सुरक्षित, सुकर आणि विश्वासार्ह प्रवासाची सुविधा उपलब्ध होण्याबरोबरच परिसराच्या कृषी, औद्योगिक आणि पर्यटन विकासालाही निश्चितच चालना मिळेल.